

# हर्षचरित

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल.वा.
दा. क्र. ५४८३८



IRBK-0105437
IRBK-0105437

संस्कृत
साहित्य
सरिता
:१५

बाण-कृत

# हर्षचरित

कथासार

ल. द. बेंबळकर



५४३७

२००९८

IRBK-0105437

IRBK-0105437

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ‘ संस्कृत-साहित्य-सरिता ’ असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भार्षेतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भार्षेतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकाचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभार्षेतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

प्रकाशक

# प रि च य

कवि बाण हा हर्षाच्या पदरीं होता आणि तो सातव्या शतकाच्या सुमारास होऊन गेला, या दोन निश्चित गोष्टी संस्कृत इतिहासास अत्यंत उपयुक्त ठरल्या आहेत. कारण यांच्या वाङ्मयांतील उल्लेखावरून इतर कवींची कालगणना करणें शक्य झालें आहे.

या कवीचीं दोन गद्यकाव्यें प्रसिद्ध आहेत: एक हें 'हर्षचरित' आणि दुसरी 'कादंबरी'. 'पार्वती-परिणय' नांवाचें एक नाटकहि त्याच्या नांवावर उपलब्ध आहे. 'चंडीशतक' नांवाचें काव्यहि त्याचेंच आहे, असें म्हणतात. हर्षासाठीं त्यानें 'प्रियदर्शिका', 'रत्नावलि', 'नागानंद', हीं तीन नाटकें लिहिलीं असा एक रूढ प्रवाद आहे.

याची वर्णनशैली मोठी बहारदार आहे. मोठे मोठे समास आणि क्लिष्ट शब्दरचना यांत त्याचा हातखंडा आहे. तो कल्पनासृष्टीचा आणि शब्दसृष्टीचा ईश्वरच आहे.

—लेखक

२०९५९
आ.ले.१२.३१
८१८
२५/१२

# हर्षचरित

कवि बाण प्रथमतः आपल्या वंशाची हकीकत सांगत आहे. :

असें ऐकिवांत आहे कीं, पूर्वी ब्रह्मदेव सत्यलोकसभेंत बसले असतांना तेथें इंद्र इत्यादिक देव, प्रजापति आणि मोठमोठे ऋषि जमले होते. सभेंत निरनिराळ्या विषयांवर वादविवाद चालू होते. यावेळीं तेथें स्वभावतःच रागीट असणारा दुर्वास ऋषिहि उपस्थित होता. त्याचा उपमन्यु नामक दुसऱ्या एका ऋषीशीं वादविवाद सुरू झाला. तेव्हां रागाच्या भरांत सामवेदाचें गायन करीत असतांना कोठें एके ठिकाणीं दुर्वासाचा बदसूर झाला. ही चूक लक्षांत येतांच वयानें अजून लहान असलेल्या सरस्वतीला राहवलें नाहीं आणि ती हंसली. तेव्हां दुर्वासानें तिला रागावून शाप दिला कीं, " तूं मृत्युलोकांत जाशील. "

या प्रकाराचा सावित्रीला संताप आला. तीहि दुर्वासाला शाप देण्यास उद्युक्त झाली. पण सरस्वतीनें तिला आवरलें. ब्रह्मदेवालाहि दुर्वासाच्या या कृत्याचा राग आला व त्यानें त्याची निर्भर्त्सना केली. सरस्वतीचें सांत्वन करीत त्यानें तिला म्हटलें कीं, " मुली, तूं खेद करूं नकोस. ही

सावित्रीहि तुझ्याबरोबर येईल. आणि तुला पुत्रमुखाचें दर्शन झालें कीं तूं येथें परत येशील."

दुसरे दिवशीं प्रात:काळींच सरस्वतीनें पृथ्वीवर अवतरण्याचा निश्चय केला. तिनें ब्रह्मदेवाला प्रदक्षिणा घातली आणि सावित्रीला बरोबर घेऊन ती पृथ्वीकडे निघाली. नंतर गंगा नदीच्या कांठाकांठानें फिरत फिरत ती मृत्युलोकांत प्राप्त झाली. पुढें तिला शोण नद दिसला. त्या महानदाला हिरण्यवाह असें म्हणत. तेथील सृष्टिसौंदर्य पाहून त्या दोघी तेथेंच राहूं लागल्या.

त्याप्रमाणें त्या तेथें राहात असतांना एक दिवस दोन घोडेस्वार तेथें येऊन उभे राहिले. त्यांपैकीं एक अठरा वर्षांचा तरुण व दुसरा वयानें बराच वृद्ध होता. त्या वृद्धानें सावित्रीला त्या तरुणाची माहिती करून दिली. "हा भार्गव-वंश-भूषण च्यवन ऋषींचा पुत्र. याच्या आईचें नांव सुकन्या. ती शर्याति राजाची मुलगी. सुकन्या गरोदर असतांना तिला बाळंतपणासाठीं पित्यानें माहेरीं नेली. तेथेंच या मुलाचा जन्म झाला. याचें नांव दधीच. याचें सर्व शिक्षण आजोबांकडेच झालें. आतां मी याला घेऊन त्याच्या वडिलांकडे परत पोहोंचवीत आहें. मी शर्याति राजाचा नोकर असून माझें नांव विकुक्षि."

त्या दोघांना सावित्रीनें आपली दोघींची ओळख मात्र दिली नाहीं. "आम्ही बरेच दिवस येथेंच राहाणार

आहोंत," एवढेंच ती म्हणाली. त्यानंतर ते दोघेहि नदीच्या पलीकडच्या तीरावर असलेल्या च्यवन ऋषींच्या आश्रमाकडे निघाले. सरस्वतीनें या संभाषणांत कांहीं भाग घेतला नव्हता. तथापि सुंदर व तरुण दधीचानें तिचें चित्त त्याच वेळीं आकर्षित करून घेतलें होतें. रात्रीं तिला झोंप-सुद्धां आली नाहीं. स्वप्नांतहि तिनें आपल्या दधीचाला पाहिलें.

असे पुष्कळ दिवस गेले आणि अकस्मात् एके दिवशीं तो विकुक्षि तेथें पुन्हां परत आला. सावित्रीनें त्याचें स्वागत केलें. तिनें त्यास विचारलें, "कुमार बरे आहेत ना?" तो म्हणाला, "भद्रे, कुमार अत्यंत सुखी आहे. तो आपली आठवणहि काढीत आहे. मात्र शरीरानें थोडासा रोड झाल्यासारखा दिसत आहे. कांहीं कारण नसतांहि तो अगदीं खिन्न झाल्यासारखा दिसत आहे. त्यानें आपली मालती नांवाची दूती आपल्या समाचारार्थ पाठविलेली आहे. ती आपणांस कांहीं बातमी सांगणार आहे." याप्रमाणें बोलून बराच वेळ थांबून नंतर आपल्या इष्ट ठिकाणीं तो निघून गेला.

कांहीं दिवसांनीं मालती नांवाची एक दूती दधीचाकडून निरोप घेऊन आली. तेथें तिला पाहातांच त्या दोघी सामोऱ्या गेल्या. तिला त्यांनीं आलिंगन दिलें. नंतर

दधीचाच्या निरोप तिनें सांगितला. आणि गोड गोड भाषणांनीं तिनें त्या दोघींचें हृदय आपल्याकडे ओढून घेतलें.

क्रमाक्रमानें दिवस माध्यान्हीं आला. सावित्री शोण-नदावर स्नान करण्यास उतरली. तेव्हां मालती एकान्तांत सरस्वतीला म्हणाली, "तुला एक विनंती करावयाची आहे."

सरस्वती तर घाबरूनच गेली. ती म्हणाली, "तूं असें कां म्हणत आहेस? मी तुझ्याकडे लक्ष देणार नाहीं, असें कसें होईल? तुला काय सांगावयाचें आहे, तें खुशाल सांग."

तेव्हां मालती म्हणाली, "देवी, विषयांची गोडी तुला माहीत आहेच. तारुण्याचा उन्माद तुला परिचित आहेच. मदनाच्या व्यथा निवारतां येत नाहींत, हेंहि तुला माहीत असेलच. म्हणून तूं माझी निर्भर्त्सना करूं नयेस. मी जें बोलणार आहें, तें केवळ बालिशपणामुळें नव्हे किंवा वावग्या बडबडीमुळेंहि नव्हे. स्वामिभक्ति कोणाला काय काय करावयास लावील हें कोणालाहि सांगतां येणार नाहीं. हें पाहा, ज्या क्षणापासून तूं आमच्या महाराजांच्या दृष्टीस पडलीस, त्या क्षणापासून त्यांची अवस्था बोलण्याच्या पलीकडची झाली आहे.

महाराज तुला योग्य आहेत,असें म्हणणें म्हणजे आपली आपण स्तुती करीत आहोंत, असा अर्थ ध्वनित होतो.

ते शीलवान् आहेत असें म्हणणें म्हणजे चालू घटिकेला विरोधी आहे. ते धैर्यशाली आहेत असें म्हणणें म्हणजे सध्यांच्या त्यांच्या झालेल्या अवस्थेला विपरीतच. तूं त्यांची गृहस्वामिनी हो असें म्हणणें म्हणजे तुला दिलेली भुलावणीच होय. केवळ पुण्यवान् माणसांनाच तूं प्राप्त होशील, असें म्हणणें म्हणजे आपल्याच मालकाची बाजू घेण्यासारखें आहे. तूं त्यांची मृत्यु आहेस, असें म्हणणें म्हणजे अप्रिय गोष्ट सांगणें होय. 'तूं त्यांच्याकडे जा' असें म्हणणें म्हणजे आज्ञाच होय. याउप्पर आपली इच्छा!"

त्याला उत्तर म्हणून आपले डोळे विस्फारून सरस्वती म्हणाली, "मी फार बोलूं शकत नाहीं. मी तुझ्या अर्ध्या वचनांत आहें. हे माझे प्राणहि हवे तर घे."

त्यावर मालतीहि म्हणाली, "देवी, जशी तुझी आज्ञा." त्यानंतर अत्यंत वेगवान् अशा घोड्यावर बसून ती शोण नदी उतरून गेली. दधीचाला आणण्यासाठीं ती च्यवनाश्रमांत परतली. सावित्रीला ही सर्व हकीकत सरस्वतीनें नंतर सांगितली.

मालतीला बरोबर घेऊन लवकरच दधीच सरस्वतीकडे आला. त्यानें आपल्या संभाषणानें सरस्वतीस संतुष्ट केलें. त्याच्याबरोबर तिनें एक वर्ष एका दिवसाप्रमाणें घालविलें.

पुढें सरस्वती व दधीच यांचें लग्न होऊन त्यांना मुलगा

झाला.त्याला 'तूं जन्मतःच सर्ववेद-कला-शास्त्रसंपन्न होशील' असा वर देऊन सरस्वती स्वर्गलोकीं निघून गेली. दधीचानें त्या मुलाचा सांभाळ केला आणि पुढें आपली भावजय अक्षमाला हिच्या हातीं सोंपवून स्वतः दधीचहि तपश्चर्येसाठीं वनांत निघून गेला. अक्षमालेला सरस्वतीच्या या मुलाच्याच वयाचा एक मुलगा होता. ते दोघेहि एक ठिकाणीं मोठ्या प्रेमानें वाढूं लागले. एक सारस्वत व दुसरा वत्स नांवानें प्रसिद्ध झाला. सारस्वत वरप्रसादानें जन्मतःच सर्वविद्यासंपन्न झाला. त्यानें वत्सालाहि त्या सर्व विद्या दिल्या . सारस्वत म्हातारा होऊन तपश्चर्येसाठीं वनांत निघून गेला.

वत्स मात्र याच प्रदेशांतील प्रीतिकूट नगरीं लग्न करून राहात होता. त्याच्यापासून एक मोठा वंश चालू झाला. या वंशांतच वात्स्यायन नामक गृहमुनी उत्पन्न झाले. या वत्स नांवाच्या थोर वंशांतच कालान्तरानें कुबेर नांवाचा एक पुरुष जन्माला आला. या कुबेराचा मुलगा पाशुपत, पाशुपताचा मुलगा अर्थपति आणि अर्थपतीचा चित्रभानु. या चित्रभानूला राजदेवी नामक आपल्या पत्नीपासून बाण नांवाचा मुलगा झाला. लहानपणींच त्याची आई मृत्यु पावली. पित्यानेंच त्याचें संगोपन केलें. उपनयनादि संस्कार होऊन तो चौदा वर्षांचा होतो तोंच त्याचे वडीलहि मृत्यु पावले.

१११८३
१०

बाणानें आपल्या मित्रमंडळींसह खूप प्रवास करून पुष्कळ अनुभव संपादन केला. त्याचें ज्ञानहि वाढलें. आणि प्रवासांतून परत येऊन तो पुन्हां आपल्या गांवीं राहूं लागला.

याप्रमाणें त्याची कीर्ति वाढत असतां उन्हाळ्याच्या दिवसांत महाराजाधिराज श्रीहर्षाचा भाऊ कृष्ण यानें मेखलक नांवाचा आपला एक दूत बाणाकडे पाठविला. मेखलकाबरोबर कृष्णानें बाणाला असें पत्र दिलें होतें कीं, " आपल्याबद्दल चक्रवर्ती हर्षाचें मन कोणीतरी कुलषित केलेलें आहे. तेव्हां आपण तत्काळ राजदर्शनासाठीं यावें. "

मग बाणानें मेखलकाला तोंडीं निरोप विचारला. मेखलक म्हणाला " आपणाला माहीतच आहे कीं, एक गोत्र, समान ज्ञान, समान जात, एकत्र संवर्धन, एकाच ठिकाणीं राहाणें किंवा पुनः पुन्हां भेटणें, इत्यादिकांमुळें प्रेम उत्पन्न होत असतें. परंतु आपल्याबद्दल तसें कांहींहि प्रत्यक्ष कारण नसतांना जवळच्या नातलगाप्रमाणें महाराजाधिराज श्रीहर्षदेव याचा भाऊ जो कृष्ण त्याच्या ठिकाणीं प्रेम उत्पन्न झालेलें आहे. त्याप्रमाणें आपल्याबद्दल चक्रवर्ती हर्षाचें मन कोणीतरी कलुषित केलेलें आहे. ज्यांना शत्रु, मित्र किंवा तटस्थ असे कोणी नसतात, असे कोणीहि या जगांत नसतात. लहान मुलें ज्याप्रमाणें कांहीं खोडकरपणा करतात, त्याप्रमाणेंच कोणीतरी आपल्याबद्दल राजाला

सांगितलें असावें. पाणी जसें खालीं खालीं वहात जात असतें, त्याप्रमाणें अविवेकी लोकांचीं मनें असतात. आम्हांला खरी माहिती आहे, म्हणून आपण जरी दूर असलां तरी प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें आम्ही जाणत आहों. आम्ही चक्रवर्तीला विनंती केली आहे कीं, सर्वच लोक आपल्या बालपणांत असेच अपराधी असतात. ' तसें असेलहि, ' असें त्या चक्रवर्तीला पटलेलेंहि आहे. म्हणून आपण मुळींच विलंब न लावतां तात्काळ राजदर्शनासाठीं यावें. राजेलोक बहुधा अविचारी असतात. तरीहि पण दुसरे राजे निराळे आणि हा राजा निराळा. नृग, नल, निषध, नहुष, अंबरीष, दशरथ, दिलीप, नभाग, भरत, भगीरथ, ययाति या सर्वांना त्यानें मागें टाकलें आहे. अहंकाररूपी कालकूटानें त्याची दृष्टि कलुषित झालेली नाहीं. गर्वरूपी विषानें भरलेली त्याची वाणी नाहीं. उद्धटपणारूपी ज्वराचा उष्मा त्याच्या ठिकाणीं नाहीं. शुचिर्भूत अशा सज्जनांना तो रत्नें मानतो; मोत्याप्रमाणें स्वच्छ असलेल्या गुणांना तो भूषणें मानतो; ज्यामध्यें दानें दिलीं जातात, अशा कृत्यांना तो आपल्या यशाचें साधन समजतो. सर्वांत श्रेष्ठ जें यश त्याची त्याला आवड असते, या जीवितरूपी वाळलेल्या गवतामध्यें नव्हे; दोरी लावून सज्ज केलेल्या धनुष्यावरच तो विसंबतो, आपल्या पिंडावर पोसलेल्या सेवकांवर नव्हे; मित्रावर उपकार करणें हाच त्याचा

आत्मा; नोकरांच्या उपयोगी पडणें हाच त्याचा अधिकार; पंडितांच्या उपयोगी येणें, हीच त्याची चतुराई; बांधवांना साह्य करणें हीच त्याची संपत्ति; ब्राह्मणांच्या उपयोगी पडणें हेंच त्याचें सर्वस्व. कमी पुण्य केलेल्या माणसांना या सर्वसुखरूपी रस उत्पन्न करणाऱ्या झाडाची छाया प्राप्त होत नसते." हें ऐकल्यावर बाणानें आज्ञा दिली कीं "याचें जेवणखाण करून यास थोडासा विसांवा द्या."

रात्रींच्या वेळीं बाण आपल्या अंथरुणावर पडला असतां विचार करूं लागला: ' मी काय बरें करावें ? मला राजा कांहीं निराळेंच समजत आहे. ज्याला मला कळविण्याचें कांहीं कारण नाहीं, त्या कृष्णानें मला कळविलें आहे. नोकरी मोठी कष्टाची असते. राजाचा दरबार अतिगंभीर असतो. पण कसेंहि असो. गेलें पाहिजे. '

दुसरे दिवशीं उठल्यावर सकाळींच स्नान करून, पांढरे शुभ्र कपडे लेवून, अक्षमाला हातांत घेऊन, प्रवासासंबंधींचीं सूक्तें व मंत्र म्हणून, देवाधिदेव जो विरूपाक्ष शंकर त्याची दुधानें मोठ्या भक्तीनें पूजा करून, भगवान् अग्नीला प्रदक्षिणा घालून, तेथील वृद्धांना नमस्कार करून, पहिल्यांदा उजवें पाऊल पुढें टाकून, तो प्रीतिकूटाहून निघाला.

तेथून तो मल्लकूट नांवाच्या गांवीं आला. तेथें जगत्पतिनामक त्याच्या मित्रानें त्याचा चांगला सत्कार

केला. दुसरे दिवशीं भगवती भागीरथी उतरून जाऊन यष्टिग्राहक नांवाच्या वनग्रामांत त्यानें ती रात्र काढली. दुसरे दिवशीं सैन्याचा तळ जेथें पडला होता, त्या मणिपूर नगरींत तो आला. राजवाड्यापासून जवळच तो येऊन उतरला.

स्नानभोजनादिक आटोपल्यावर थोडासा विसांवा घेऊन बाण राजद्वारापाशीं आला. मेखलक त्याच्याबरोबरच होता. त्यानें आंत जाऊन द्वाररक्षकाला सांगून बाणाच्या राजदर्शनाची व्यवस्था केली. पारियात्र नांवाच्या या द्वाररक्षकाबरोबर बाण पुढें निघाला. वाटेंत त्यानें राजाचा आवडता दर्पजात नांवाचा हत्ती पाहिला. त्या हत्तीकडे तो आश्चर्यचकित होऊन पाहात असतांना पारियात्रानें त्याला राजाच्या दर्शनासाठीं चलण्याचा आग्रह केला.

तो हर्ष पराक्रमाची खाणच होता. तो सरस्वतीचें सर्व विद्यांचें एकत्रिक झालेलें स्थानच होता. तो अमृतमंथनाचा आणि लक्ष्मीप्राप्तीचा दुसरा दिवसच होता. तो गंभीर होता, तो प्रसन्न होता, तो भीति उत्पन्न करणारा होता, तो सुंदर होता; तो आश्चर्य उत्पन्न करणारा होता. तो पुण्यशील होता.

राजसभेंत येऊन हर्षाचें दर्शन घडतांच बाण मनांत म्हणाला, 'हाच तो तेजाचा राशी, चारी समुद्रांनीं वेढलेल्या

पृथ्वीचा पति, परमेश्वर हर्ष. याच्याच योगानें ही पृथ्वी राजवन्ती ठरली.'

इतक्यांत हर्षाचें लक्ष बाणाकडे गेलें. "हाच का तो बाण ?" त्यानें विचारलें.

"होय, तोच हा," असें त्या द्वारपालानें उत्तर दिलें. तेव्हां पाठीमागें वळून हर्ष मालव-राजपुत्राला म्हणाला, "महान् अयं भुजंगः।" (याचे अर्थ अनेक आहेत; परंतु 'हा भयंकर साप' असाच त्याचा अर्थ लक्षांत घेऊन बाणाला राग आला.)

आपल्यावरील ही कठोर टीका ऐकून बाणानें उत्तर दिलें. "महाराज, खरें काय आहे तें माहीत नसतांना, विश्वास न ठेवतांना, दुसऱ्यांनीं कान भरविल्याप्रमाणें आपण असें काय म्हणत आहांत ? लोकांचे स्वभाव आणि प्रवाद विविध प्रकारचे असतात. आपण जसें मला समजत आहांत, तसा मी नाहीं. मी ब्राह्मण आहें आणि वात्स्यायन कुळांत जन्म पावलों आहें. माझ्या उपनयनादि क्रिया यथाशास्त्र झालेल्या आहेत. मी वेदांचा आणि शास्त्रांचा अभ्यास केलेला आहे. माझें बाळपण दोन्ही लोकांना विरोध न होईल अशा रीतीनें मी घालविलें आहे. आपणासारखे शास्ते असतांना हे भृंगसुद्धां भीतभीतच मधुपान करितात. हे कपिसुद्धां बावरून जाऊन चंचलत्व आचरितात. आपण कांहीं काळानेंच माझी पारख कराल."

त्यावर हर्षानें इतकेंच प्रत्युत्तर केलें कीं, “असें आम्हीं ऐकलें होतें.” एवढ्यावर तोहि स्तब्ध झाला. संभाषण, आसन इत्यादिक कृपेनें राजानें बाणाचा सत्कार केला.

तेथून बाण परत मुक्कामीं आला तेव्हां त्यानें मनाशीं निश्चय केला कीं, ‘महाराज श्रीहर्ष मला यथायोग्य रीतीनें जाणून घेतील असेंच मी कांहींतरी करून दाखवीन.’ त्याप्रमाणें दुसरे दिवशीं बाण तेथून निघून गेला आणि आपले मित्र व बांधव यांच्या घरीं राहूं लागला. राजाची कृपाहि त्याला लाभली. पुन्हां तो राजवाड्यांत गेला. त्याचा तेथें मोठा सत्कार झाला. त्यानंतर कांहीं काळानें बाण प्रीतिकूट नगरांत आपल्या घरीं परत आला.

प्रीतिकूटांतील लोकांनींहि त्याचा सत्कार केला. उलट बाणानेंहि त्याची विचारपूस केली. त्यांनीं उत्तर दिलें कीं, “हा राजा राज्य करीत असतांना आम्हांला सुख नाहीं असें कसें घडूं शकेल ?” नंतर बाणाच्या चार पुतण्यांपैकीं श्यामल म्हणून जो होता त्यानें विचारल्यावरून बाणानें दुसरें दिवशीं हर्षचरित सांगण्यास आरंभ केला :

पूर्वीं या पृथ्वीवर पुण्यवान लोकांचें राहाण्याचें ठिकाण असा श्रीकंठ नांवाचा प्रदेश होता. त्यामध्येंच स्थाण्वीश्वर नांवाचें एक शहर होतें. तें शहर मुनींना तपोवन, नर्तकांना संगीतशाळा, शत्रूंना यमनगरी, याचकांना चिंतामणिभूमी आणि विद्यार्थ्यांना गुरुकुलच भासत होतें.

तेथील स्त्रियांची चाल हत्तींच्याप्रमाणें होती, आणि त्या शीलवतीहि होत्या. त्यांचे दांत पांढरे स्वच्छ होते. त्यांचीं तोंडें पवित्र होतीं. त्यांच्या उच्छ्वासाला मदिरेचा वास येत होता. त्या स्त्रियांचें खरोखरी डोळे हेंच भूषण, कमळांच्या माळा म्हणजे केवळ भारच. त्यांची वाणी हीच मधुर वीणा, वीणावादन हें केवळ बाह्यज्ञान. त्यांचे बाहूच अत्यंत कोमल अशा विनोदानें प्रहार करण्याच्या वेत्रलता, कमळांचीं देंठें निरर्थकच.

तेथें प्रत्यक्ष इंद्राप्रमाणें सर्व वर्णांचें धनुष्य धारण करणारा, भाषणांत गुरु असणारा, वक्ष:स्थळीं पृथु म्ह. विशाल असणारा, तपश्चर्येंत जनक राजाप्रमाणें असणारा, कीर्तीमध्यें अर्जुनाप्रमाणें असणारा, प्रजाकृत्यांमध्यें दक्ष असणारा, असा पुष्यभूति नांवाचा राजा होता. तो शंकराचा उपासक होता.

एकदां सायंकाळीं राजा अंत:पुरांत असतांना द्वारपालानें येऊन वर्दी दिली कीं, ' कोणी संन्याशी आपणांस भेटण्यास आलेला आहे. भैरवाचार्यांच्या सांगण्यावरून आपणांस भेटण्यासाठीं आपण आलों आहोंत, असें तो सांगत आहे.' राजा म्हणाला, " त्याला इकडे घेऊन या. "

प्रतिहारीनें त्यास आज्ञेप्रमाणें आंत आणलें.

तेव्हां त्यानें सांगितलें, " भैरवाचार्य सरस्वतीच्या तीरावरील शून्य देवालयांत राहात आहेत. आपणाला

त्यांनीं आशीर्वाद दिलेला आहे आणि हीं पांच सोनेरीं कमळें आपणांसाठीं धाडिलीं आहेत."

त्या कमळांचा स्वीकार करून राजा म्हणाला, " सर्व फळें प्राप्त करून देणारी ही शंकराची भक्तीच याप्रकारें फलद्रूप होत आहे, म्हणून भैरवाचार्य आमच्यावर असे प्रसन्न झालेले आहेत. मी त्यांस उद्यां भेटेन."

त्याप्रमाणें दुसरे दिवशीं सकाळींच उठून, घोड्यावर बसून, आपलें शुभ्र छत्र फडकवीत, कांहीं राजपुत्रांच्या समवेत तो भैरवाचार्यांना भेटण्यासाठीं गेला.

भैरवाचार्यांनीं राजाला दुरूनच पाहून " स्वस्ति " असा आशीर्वाद दिला. चंद्राला पाहून समुद्र जसा उचंबळून येतो, त्याप्रमाणें त्याचें मन भरून आलें होतें. परस्पर संभाषण होऊन राजा घरीं परत आला. दुसरे दिवशीं भैरवाचार्य त्यास भेटण्यास राजवाड्यांत आले आणि कांहीं काळ थांबून परत निघून गेले.

एकदां भैरवाचार्यांनीं पांढऱ्या कपड्यांत गुंडाळलेलें कांहींतरी आणलें आणि तें राजास अर्पण केलें. ते म्हणाले, " महाभागा, माझा पातालस्वामी नांवाचा एक शिष्य आहे. त्यानें एका ब्रह्मराक्षसाच्या हातून ही तलवार हिसकावून घेतली. 'अट्टहास' हें हिचें नांव. ही तुझ्या हातांत असणें योग्य आहे." असें सांगून त्यांनीं ती तलवार त्यास दिली.

तो राजानें स्वीकारल्यावर, " तुझें कल्याण असो. आम्ही जातों, " असें सांगून भैरवाचार्य निघून गेले.

याप्रमाणें बरेच दिवस लोटले. एकदां राजाला एकान्तांत भैरवाचार्य म्हणाले, " मी महाकाल नामक महामंत्राचा स्मशानांत कोटी जप केलेला आहे. त्याची सिद्धि व्हावयाची आहे. वेताळ प्रसन्न झाला, म्हणजे ती सिद्धि प्राप्त होणारी आहे. मात्र कोणाचें तरी साह्य असल्याशिवाय हें शक्य होणार नाहीं. तू या कर्मासाठीं योग्य आहेस. तूं तयार होशील तर इतर तिघेहि तयार होतील. " राजानें तें मान्य केलें, तेव्हां भैरवाचार्य आनंदित झाले. " तर येत्या अमावास्येला याच शून्य देवालयांत या वेळेला आपली तलवार घेऊन आपण सिद्ध असावें, " त्यांनीं राजाला सांगितलें.

ती वेळ आली, तेव्हां राजा तयारच होता. तो नगरांतून बाहेर पडला आणि त्या ठिकाणीं प्राप्त झाला. तिकडे त्या दाट अंधारांत ते इतर तिघे होतेच. ते चौघे भैरवाचार्यांना भेटले; आणि चौघे चार दिशांना उभे राहिले.

भैरवाचार्य आपलें साधन करीत होते. इतक्यांत ती जमीन फाटली आणि एक दिव्य नाग प्रकट झाला. तो म्हणाला, " भैरवाचार्या, तुला विद्यासिद्धि पाहिजे आहे. पण मला बळी मिळाल्याशिवाय तुला सिद्धि कशी प्राप्त

होणार ? मी या देशाचा मालक आहें. माझें नांव श्रीकंठ नाग. माझ्या नांवावरूनच या देशाला श्रीकंठ असें नांव पडलें आहे. माझ्या इच्छेशिवाय ग्रहगणांना तरी या आकाशमार्गांतून पलीकडे जाण्याची शक्ति आहे काय ? हा राजा जरी राजा असला तरी अनाथच आहे. त्याचें तूं साह्य घेत आहेत. या तुझ्या अविचारीपणाचें फळ भोग." याप्रमाणें बोलून त्या तिघांवर त्यानें झडप घातली.

राजा रागावून म्हणाला, " हे दुष्टा, मी या ठिकाणीं असतांना बळी मागण्याची तुला लाज नाहीं वाटत ? तूं शस्त्र घे. बाहूंत वीर्य असतें, तोंडांत नसतें. हा पाहा तुला होतास कीं नव्हतास, असें करून टाकतों." असें म्हणून राजानें त्यावर प्रहार केला." शस्त्र कशाला? बाहूंनींच तुझा गर्व नाहींसा करून टाकतों," असें तो नाग म्हणाला. तेव्हां त्या दोघांचें बाहुयुद्ध सुरू झालें. राजानें त्या नाग-पुरुषाला भूमीवर पाडलें. त्याचे केंस धरले आणि त्याचें मस्तक उडविण्यासाठीं अट्टहास खड्ग उपसलें, तोंच त्याला त्याच्या गळ्यांतील यज्ञोपवीत दिसलें. तेव्हां तो खेंकसून म्हणाला, " दुष्टा, हें तुझ्याजवळ तुझा दुष्टपणा लपवून टाकणारें बीज आहे." असें म्हणून राजानें त्यास सोडून दिलें. तितक्यांत स्वच्छ उजेड पडलेला त्याला दिसला. नूपुरांचा आवाज ऐकूं आला. त्या शब्दाच्या अनुरोधानें राजानें तिकडे दृष्टि फिरविली.

ती एक स्त्री होती. तिला पाहातांच राजा गडबडून गेला. त्यानें तिला विचारलें, "हे स्त्रिये, तूं कोण आहेस ? तूं येथें कां अवतीर्ण झाली आहेस ?" ती स्त्री म्हणाली, "हे वीरा, मी नारायणापाशीं राहाणारी लक्ष्मी आहें. तुझ्या शौर्यानें मी प्रसन्न झालें आहें. तुला पाहिजे आहे तो वर मी देईन."

राजा निरिच्छ होता. त्यानें मागितलें, "भैरवाचार्यांना सिद्धि प्राप्त व्हावी." लक्ष्मीनें तें मान्य केलें. आणि ती पुढें म्हणाली, "तुझा वंश विस्तार पावेल. आणि या तुझ्या वंशांत हर्ष नामक एक चक्रवर्ती राजा उत्पन्न होईल." नंतर ती अंतर्धान पावली.

राजाला तें ऐकून आनंद झाला. भैरवाचार्यालाहि तात्काळ विद्याधररूप प्राप्त झालें. त्यानें राजाचा निरोप घेतला व तो आपल्या स्थानाला निघून गेला. श्रीकंठ नागहि राजाची परवानगी घेऊन त्याच विवरामध्यें शिरला आणि गुप्त झाला.

राजा सकाळीं आपल्या नगरांत आला आणि स्वच्छ पाण्यानें त्यानें स्नान केलें.

या राजा पुष्पभूतीपासून मोठा राजवंश विस्तार पावला. क्रमाक्रमानें त्या कुलांत हूणरूपी हरिणांना सिंहा-

प्रमाणें असणारा, सिंधुराजाला ज्वराप्रमाणें असणारा, गुर्जरांना झोंप येऊं न देणारा, गांधार-देशरूपी हत्तीला हस्तिज्वराप्रमाणें असणारा, असा प्रभाकरवर्धन नामक राजाधिराज जन्माला आला. तो राजा राज्य करीत असतांना दिशादिशांमधून पसरत जात असलेल्या यज्ञाच्या धुरामुळें कलीनें पलायन केलें होतें. देवांच्या व अमृताच्या समवेत स्वर्गानें खालीं अवतरण केलेलें होतें. ब्राह्मणांना दिल्या जात असणाऱ्या द्रव्यामुळें भाग्यरूपी लक्ष्मी जणूं सुफल झालेली होती.

त्याच्या राणीचें नांव यशोमती. शंकराची जशी पार्वती, विष्णूची जशी लक्ष्मी, चंचलनयना रोहिणी जशी चंद्राची; तशी ती होती.

तो राजा आदित्यभक्त होता. अपत्यासाठीं तो सकाळ-दुपार-सायंकाळ आदित्याचा जप करीत असे.

एकदां ग्रीष्मऋतूंत राजा राजवाड्याच्या गच्चीवर झोंपला होता. दुसऱ्या शयनावर राणी यशोमती झोंपली होती. सकाळच्या सुमारास राणी एकाएकीं " आर्यपुत्रा, रक्षण करा, रक्षण करा, " असें ओरडत उठली.

राजा जागा झाला. त्यानें तिला धीर दिला. तिला भीतीचें कारण विचारलें. तेव्हां ती जराशी थांबली. तिच्या हृदयाचा होत असलेला धडधडाट थांबला. भीतीहि

(२३)

थोडीशी दबली. तेव्हां ती म्हणाली, “आर्यपुत्रा, मला असें आठवत आहे, स्वप्नांत सूर्याच्या मंडलांतून दोन तेजस्वी कुमार निघाले. त्यांनीं मुकुट घातले होते. त्यांनीं कुंडलें व कवचहि घातलीं होतीं. त्यांच्या हातांत शस्त्र होतें. लाल लाल रक्तानें ते हाले होते. सर्व जग त्यांना नमस्कार करीत होतें. त्यांच्याबरोबर एक कन्याहि होती. तीं सर्वजण जमिनीवर अवतीर्ण झालीं. ते दोघे, मी रडत असतांनाच, शस्त्रानें माझें पोट फाडून त्यांत शिरूं पाहात होते. मी एकदां खडबडून जागी झालें.”

या वेळीं प्रभातकाळचीं मंगलवाद्यें वाजूं लागलीं. तेव्हां राजा तिला म्हणाला, “देवी, या आनंदाच्या प्रसंगीं तूं निष्कारण खिन्न होत आहेस. सर्व वडिलधाऱ्या माणसांचे आशीर्वाद आज फलद्रूप झाले आहेत. आपले मनोरथ पूर्ण झाले आहेत. भगवान् सूर्य तुजवर प्रसन्न झालेला आहे. लौकरच तुला तीन अपत्यें होणार आहेत.” यशोमतीहि पण पतीच्या या भाषणानें संतुष्ट झाली.

कांहीं दिवस गेले आणि राणीला राज्यवर्धन नांवाचा एक मुलगा झाला. नंतर कांहीं काळानें हर्ष जन्मास आला. त्याच्या जन्माच्या वेळीं तारक नामक प्रख्यात ज्योतिष्यानें असें भविष्य वर्तविलें कीं, “राजा, पूर्वी मांधाता राजा या लग्नावर जन्मलेला होता. त्याच्यासारखा दुसरा चक्रवर्ती त्याच्यानंतर झाला नाहीं. सात चक्रवर्तींच्या मध्यें

श्रेष्ठ, सात सागरांचा पालन करणारा, यज्ञांचें प्रवर्तन करणारा, सूर्याप्रमाणें असणारा, असा हा पुत्र आपल्यास झालेला आहे. ”

त्याचा जन्मदिवस पुष्कळ काळपर्यंत प्रजाजनांनीं साजरा केला. आणि कांहीं काळानें राज्यश्री नामक एक कन्यारत्न राजाला झालें.

राणी यशोमतीच्या भावाचा सुमारें आठ वर्षें वयाचा एक मुलगा होता. त्याचें नांव भंडि. तोहि याच सुमारास या तिघांत येऊन मिसळला.

वयांत आल्यानंतर त्या दोघां राजपुत्रांना राजानें माधवगुप्त नांवाच्या आचार्यांच्या स्वाधीन केलें. राज्यश्री आपल्या मैत्रिणींच्या सहवासांत नृत्य-गीत इत्यादिक कलांमध्यें निपुण झाली. कालांतरानें ती यौवनावस्थेस प्राप्त झाली. सर्व राजेलोकांची दृष्टि तिच्यावर खिळली. पुष्कळ राजांनीं तिला मागणी घातली.

तेव्हां एकदां राजा राणीला म्हणाला, “ देवी, ही राज्यश्री आतां तरुण झाली आहे. या राजेलोकांत मौखर वंश श्रेष्ठ आहे. त्या वंशांतील अवंतिवर्मा नांवाचा जो राजा त्याला ग्रहवर्मा नांवाचा मुलगा आहे. त्यानें हिला मागणी घातली आहे. जर तुला योग्य वाटत असेल, तर मी ही त्याला देईन, असें म्हणतों. ” महाराणीनें उत्तर

दिलें, " जशी आपली इच्छा असेल, त्याप्रमाणें. " निश्चय झाल्यानंतर शुभदिवशीं मागणी घालण्यास आलेल्या दूताच्या हातावरच राजानें सर्व राजकुलासमक्ष कन्यादानाचें उदक सोडलें. योग्य वेळीं विवाहसमारंभ पार पडला. दहा दिवस राहून ग्रहवर्मा आपल्या कान्यकुब्ज नगरास परत गेला.

इकडे राजा प्रभाकरवर्धनानें आपल्या राज्यवर्धन या थोरल्या मुलाबरोबर जुने व स्वामिनिष्ठ असलेले अमात्य दिले व त्यास उत्तरापथ जिकण्यास पाठविलें.

कांहीं मुक्कामांत हर्षहि त्यांच्याबरोबर गेला. वाटेंत हर्ष शिकारींत गढून गेला.

एकदां पहांटेच्या वेळीं त्यानें स्वप्नांत पाहिलें कीं एक सिंह दावाग्नीमध्यें जळत आहे आणि त्याच अग्नींत आपल्या पिलाला सोडून सिंहीण उडी घेत आहे. हें स्वप्न वाईट आहे हें त्यास समजलें. त्याचा डावा डोळाहि फडफडत होता. त्यामुळें तो खिन्न होऊन राहिला होता.

लांबूनच एक पत्रवाहक दूत येत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या दूतानें जवळ येऊन हर्षाला नमस्कार केला. त्याचें तोंड खिन्न झालेलें होतें. त्यावरूनच सर्व कांहीं कळून आलें होतें. त्यानें तें पत्र हर्षाच्या हातीं दिलें आणि तो एकदम म्हणाला, " महाराजांच्या अंगाचा अगदीं

भडका उडालेला आहे." तें ऐकल्याबरोबर मोठ्या त्वरेनें त्यानें घोड्यावर खोगीर घातलें व तो कांहींहि न खातां तसाच नगरीकडे निघाला. पुष्कळ दिवसहि चालून जो रस्ता संपणार नाहीं, असा रस्ता त्यानें अगदीं थोड्या वेळांत काटला. तो आपल्या नगरींत येऊन पोहोंचला. तेथून राजवाड्यापाशीं आला. तेथें त्याला राजाच्या अत्यवस्थ अवस्थेची हकीकत कळली.

तो राजवाड्यांत गेला. राणी यशोमती पुन:पुन्हां विचारीत होती, "महाराज, झोंप येते आहे का?" ती त्यांचें अंग रगडीत होती. अशा स्थितींत आपला पिता हर्षाच्या दृष्टीला पडला.

राजानें आपल्या मुलाला लांबूनच पाहिलें. मनानेंच तो पुढें धांवत गेला, आपले बाहू पुढें पसरले आणि "ये, ये" म्हणून त्यास बोलाविलें. आपल्या पलंगापाशीं नम्र झालेल्या आपल्या मुलास डोळ्याची पापणीहि न हालवितां त्यानें पाहिलें. आपल्या थरथर कांपणाऱ्या हातांनीं त्यास कुरवाळिलें. "बाळा, तूं कृश झालास काय रे?" म्हणून विचारलें. त्यावर भंडीनें उत्तर दिलें, "महाराज, भोजन करून आज त्याचा हा तिसरा दिवस आहे."

राजानें त्यास भोजन करायला सांगितलें. त्याप्रमाणें जेवणखाण उरकून तो परत वडिलांकडे आला. त्यानें

तेथील चिकित्सकांना विचारलें, "आत्तां काय करायला हवें आहे?" त्यांनीं सांगितलें कीं, "कांहीं दिवसानंतर राजे बरे झालेले आहेत, असें तुला ऐकूं येईल."

त्यांच्यापैकीं रसायन नांवाचा एक अति निष्णात वैद्य होता. त्याला हर्षानें विचारलें, तो म्हणाला, "उद्यां सांगेन."

त्या रात्रीं राजाला फारच त्रास झाला. रात्रभर सारखी आग होत होती. हर्ष सकाळीं तेथें आला. त्यालाहि रात्रभर चैन नव्हतें. तेवढ्यांत "अरेरे रसायन, अरेरे रसायन" असें कोणीं ओरडलें. हर्षानें चौकशी केली तेव्हां कळून आलें कीं, 'रसायनानें अग्नींत उडी टाकली आहे.' तें ऐकून हर्षाची चर्या पालटली.

दुसऱ्या दिवशीं वेला नांवाची, राणी यशोमतीची दासी, 'कुमार कोठें आहे, कुमार कोठें आहे,' अशी चौकशी करीत हर्षाकडे आली. ती म्हणाली, "महाराज, राणीनें हें काय करावयाचें ठरविलें आहे? रक्षण करा, रक्षण करा!"

हर्ष तेथून निघाला आणि आईकडे आला. तिनें सती जाण्याची तयारी केली होती. तिनें सर्वांचा निरोप घेतला होता. सर्वांचे आशीर्वाद ती घेत होती. ती सर्वांची क्षमा मागत होती. पतीच्या कुत्र्यांकडेसुद्धां ती अश्रुपूर्ण नयनांनीं पाहात होती.

हर्षानें आईला विनंती केली पण तिनेंच त्याची समजूत घातली. तिचा निश्चय पाहून हर्ष स्तब्ध झाला.

हर्ष राजापाशीं आला. तो त्यास हळुहळु म्हणाला, " मुला, असें खिन्न होणें योग्य नाहीं. तूं कुलदीपक आहेस. ही पृथ्वी आतां तुझी आहे. या लक्ष्मीचा स्वीकार कर. प्रजेचें नीट पालन कर. सर्व शत्रु नष्ट कर. " याप्रमाणें बोलत असतांनाच राजानें डोळे मिटले ते कायमचेच. हर्षानें स्वत: शवपेटिका वाहिली, ती सरस्वतीच्या तीरावर नेली आणि यथायोग्य रीतीनें त्या देहास अग्निसंस्कार केला.

हर्षानें आपला भाऊ जो राजवर्धन त्यास बोलावणें पाठविलें. त्याला चिंता वाटूं लागली कीं पित्याचा मृत्यु झाला आहे असें कळल्यावर राज्यवर्धन परत येईल कीं नाहीं ? येऊन राज्य स्वीकारील कीं नाहीं ?

दहा दिवसांचा अशौचकाल संपला. तेव्हां राज्यवर्धन आल्याची वार्ताहि आली. हर्ष आणि राज्यवर्धन दोघे एकमेकांस भेटले. राज्यवर्धन नंतर आपल्या पलंगावर अगदीं स्वस्थ पडला. त्याच्या डोळ्यांतील पाणी शरत्कालच्या ढगांप्रमाणें केव्हांच आटून गेलें होतें.

दुसऱ्या दिवशीं सर्व सामंतांची सभा भरली. त्यांत राज्यवर्धनानें आपण राज्यत्याग केल्याचें सांगितलें. हर्षाला वाईट वाटलें. त्याला वाटलें कीं आपल्याबद्दल आपल्या

२०९५९
व्याते ५१:
८०१

भावाचा वृथाच कांहीं गैरसमज झालेला आहे. तितक्यांत संवादक नांवाचा राज्यश्रीचा एक नोकर रडत ओरडत तेथें प्राप्त झाला. सर्व लोक घाबरून गेले. राज्यवर्धनानें स्वत: विचारल्यावरून त्यानें सांगितलें, " महाराज, महाराज प्रभाकरवर्धन मृत्यु पावल्याची बातमी ज्या दिवशीं समजली, त्याच दिवशीं मालवराजानें कपटानें ग्रहवर्म्यास ठार मारलें. राज्यश्रीला सुद्धां बेड्या घालून तुरुंगांत डांबून ठेविलें. आणि अशी बातमी आहे कीं हें राज्य निर्नायिक आहे, असें समजूत तो इकडेहि चालून येत आहे."

ही हकीकत कळतांच राज्यवर्धनाला राग आला आणि तो म्हणाला, " मालवराजानें मौखरांचा जो पराजय केलेला आहे, तो पुष्यभूती वंशाचाच होय. या एका भंडीला घेऊन मी त्याच्या उच्छेदार्थ जात आहें. " आणि बरोबर दहा हजार सैन्य घेऊन तो निघालाच.

हर्ष एकटाच घरीं होता. कांहीं काळानें त्यास निरोप कळला कीं, नि:शस्त्र अशा राज्यवर्धनाला त्याच्या राहाण्याच्या जागींच गौडाधिपतीनें मारून टाकलेलें आहे. त्याला राग आला आणि गौडाधिपतीला शासन करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली व तो तयारीला लागला. तो जेव्हां स्वारीवर निघाला, तेव्हां त्याच्या शत्रुपक्षासंबंधीं अनेकविध अशुभचिन्हें होऊं लागलीं.

त्याचे मित्रराजे त्यास येऊन मिळत होते. त्याचें सैन्य

वाढत होतें. तशांत प्राग्ज्योतिषाच्या राजानें त्याजकडे एक विलक्षण छत्र आपल्या दूताकरवीं पाठवून दिलें. तें फक्त चक्रवर्ती राजालाच योग्य होतें. राजानें तें छत्र पाहिलें व तो संतुष्ट झाला. प्रयाणाच्या पहिल्याच मुक्कामाला ही भेट मिळाली याचा त्याला आनंद झाला. हा शुभशकुन झाला असेंच त्यास वाटलें.

कांहीं दिवसांनीं राज्यश्रीकडील एक दूत आला. त्यानें सांगितलें कीं, "राज्यश्री विंध्यारण्यांत नापत्ता झालेली आहे. तिच्या शोधार्थ पुष्कळ लोक पाठविले आहेत, पण अजून तिचा शोध लागत नाहीं." हर्षानें तात्काळ बाकीच्या राजे लोकांना आज्ञा केली कीं "तुम्ही गौडाधिपतीवर चालून जा. मी राज्यश्रीच्या शोधार्थ विंध्यारण्यांत जातों." आणि तो निघालाहि.

त्या अरण्यांत पुष्कळ दिवस भटकूनहि त्यास राज्यश्री मिळाली नाहीं. दिवाकरमित्र नांवाचा एक बौद्ध साधु तेथें राहात होता. त्याची गांठ त्यानें घेतली पण त्यालाहि राज्यश्रीचा पत्ता नव्हता. ते दोघे असें बोलत आहेत, तोच एका शिष्यानें येऊन सांगितलें कीं, "या नदीच्या तीरावर कोणी एक सुंदर स्त्री अग्निकाष्ठ भक्षण करून मृत्यु पावत आहे. कोणीतरी तिकडे चला व तिला वांचवा."

हर्ष व दिवाकरमित्र यांच्या समवेत तो शिष्य तिकडे गेला. हर्षाला ती स्त्री दिसल्याबरोबर त्यानें ओळखलें

कीं ही राज्यश्रीच. ती चितेंत उडी टाकण्याच्या बेतां-तच होती. तिला हर्षानें अडविलें. दिवाकरमित्रानेंहि तिची समजूत घातली. तेव्हां तिनें आपला सती जाण्याचा निश्चय बदलला. तेथून ती दिवाकरमित्राच्या मठांत आली. राजा हर्ष तिला घेऊन जान्हवीच्या तीरावर आपल्या सैन्यांत येऊन मिळाला.

( हर्षचरित येथें समाप्त झालें. )

IRBK-0105437
IRBK-0105437